# प्रकरण चौथे

# प्रकरण चौथे

# कोकणातील सामाजिक स्थिती व खोती पध्दती

कोकणची तीन क्षेत्रात विभागणी केलेली होती.

१) रत्नागिरी क्षेत्र ३७८९ चौरस मैल,

२) कुलाबा क्षेत्र १४८२ चौरस मैल,

३) ठाणे क्षेत्र ४०६२ चौरस मैल

ठाणे, कुलाबा आणि कांही प्रमाणात रत्नागिरीतसुध्दा जाती विशिष्ट व्यवसायाशी निगडीत असून कांही स्थानिक वैशिष्टये वगळता जवळजवळ सारख्याच होत्या व आहेत.

कोकणातील सर्वच लोक शेकडो लहान लहान समुहामध्ये विभागलेले होते. हे समुह म्हणजेच भारतीय भाषामध्ये जाती आणि पाश्चात्य मानववंशशास्त्रामध्ये कास्ट.[१]

हिंदुस्थानाच्या बाकीच्या भागाप्रमाणेच कोकणातही शेतकरी समाजाचीच वस्ती अधिक होती आणि त्याची विभागणी -

१) सुमारे ७० टक्के अन्नधान्योत्पादन करणारे

२) सुमारे ८ टक्के उपाध्याय व्यवसायातले

३) सुमारे ८ टक्के सरंजामी करणारे

४) सुमारे १० ते १२ टक्के कारागिर

५) सुमारे ४ टक्के व्यापारी

६) कांही थोडे कारखानदार

७) अत्यल्प, शेतकरी समाजात न सामावणारे होते.

अशा प्रकारे कोकणातील समाज जाती व उपजाती आणि त्याचे पोट विभाग यांनी बजबजलेला होता. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांचे आपापसातील भेदभाव नष्ट करणे किंवा निदान कमी करणे अशक्यप्राय होते.

विशिष्ट चालीरिती आणि संस्कार यांनी संस्कारित निगडीत असे समाज घटक, जाती म्हणून संघटित करण्यात आले. या विशिष्ट चालीरिती आणि संस्कार यांच्या विधीनिषेधानुसारच आंतरजाती संबंधाचे स्वरुप व मर्यादा ठरत असत.

कोणाही व्यक्तीची जात ही त्याच्या जन्मावरुन ठरविण्यात येई. ज्या जातीत तो जन्माला आला त्या जातीचे नेमनियम व रीतीभार्ती यातून त्याची सुटका नसे. दुसऱ्या कोणत्याही नीतितत्त्वांच्या संहितेपेक्षा हे नेमनियम अधिक बंधनकारक असत. जातीविषयक कोणत्याही बाबतीत या जातीविषयक बंधनाचे काटेकोर पालन जाती बांधव हक्काने करुन घेत. रुढीने घालून दिलेल्या रितीरिवाजांची भौगोलिक आडकाठयांनी कांही फरक पडत नसे. थोडक्यात कोणत्याही व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक हालचालींचे क्षेत्र या रितीरिवाजांनीच ठरत असे. जात आणि व्यवसाय यांचा निगडीत संबंध होता. कोणतीही जात आपल्यातील व्यक्तीला एक कमीपणा आणणारा किंवा अपवित्र[२] समजला जाणारा धंदा करु देत नसे. अन्य जातीने आपल्या जाती बांधवाखेरीज इतरांनी आपले व्यवसाय करु नयेत अशा तऱ्हेचे घातलेले

निर्बंधही दुसऱ्या धंदयाची निवड करण्यात अडथळे आणीत. या सर्वांच्या मुळाशी आर्थिक हितसंबंध असत. जातीविषयक विचार बाजूला ठेवला तरी आपल्या व्यवसायावर अन्य जातीच्या कोणीही अतिक्रमण केलेतर स्वाभाविकपणेच त्यांचे आर्थिक हितसंबंध धोक्यात आल्याने ते प्रतिक्रियेला प्रवृत्त होत.[३]

## बलुतेदार पध्दती

कोकणात बलुतेदारी पध्दती अस्तित्वात होती.[४] त्याकाळी बलुतेदारांच्या तीन यादया होत्या असे प्रसिध्द झालेल्या मराठी साधनांवरुन दिसते. बलुतेदारांची नावे मात्र निरनिराळया यादयांमध्ये बदललेली दिसतात. सन १७६५ च्या यादीत ११ बलुतेदारांचा निर्देश आहे. ते पुढीलप्रमाणे - १) सुतार, २) न्हावी, ३) चांभार, ४) गुरव, ५) कुंभार, ६) परीट, ७) वाणी, ८) डोंबारी, ९) सोनार, १०) धनगर, ११) तेली.

सन १७९९ च्या दुसऱ्याएका कागदपत्रात बलुतेदार १२ असल्याचा उल्लेख आहे. याच कागदात आणखी कांही बलुतेदारांची प्रतवारीही दाखविली आहे. सुतार, चांभार, मांग आणि महार हे वरच्या प्रतीचे निर्दिष्ट केले आहेत. कुंभार, न्हावी, परीट व लोहार हे कमी दुसऱ्या प्रतीचे म्हटले आहे. तिसऱ्या प्रतिमध्ये जोशी, गुरव, सोनार व मुलाणी हे दाखविले आहेत. सन १८१८ च्या यादीत परीट, आतार, हलालखोर, मण्येर, पानसरे, लोहार, चांभार, मांग, महार, गुरव, शिंपी, बुरुड आणि वाणी या नावांचा उल्लेख आहे. हे एकूण १३ होतात. प्रसिध्द न झालेल्या एका कागदपत्रात सुतार, परीट, कुंभार, हकम, (न्हावी), चांभार, गुरव, लोहार, महार, मांग आणि कोळी अशा दहा बलुतेदारांचा समावेश आहे.[५]

अशा प्रकारे वर निर्देशिलेल्या तीन यादयावरुन बलुतेदारांची संख्या १० ते १३ पर्यंत बदलताना दिसते. चांभार, गुरव यांचे उल्लेख मात्र सर्व यादयात आहेत.

## सुतार

याला उच्च जातीचा बलुतेदार मानीत. सन १७९९ मध्ये सवाई माधवरावांनी लिहिलेल्या पत्रात असे आदेश आहेत की, सर्व देशात/राज्यात सुताराला सर्वश्रेष्ठ जातीचा बलुतेदार समजावे. त्याच्या या सर्वश्रेष्ठ जातीमुळे सुताराकडून शासनाने १ रु. नजराणा घ्यावयाचा असे. सुताराने तयार केलेला नांगर शेतकरी वापरीत असत.[६]

घरबांधणी व शेतीची अवजारे यासाठी सुताराची सेवा शेतकऱ्याला विशेष महत्त्वाची होती. नांगर तयार करुन दिल्याबद्दल सुताराला धान्य मिळे. तसेच ऊसासाठी चरक पुरविल्याबद्दल सुताराला ऊस, गुळ, धान्य शिवाय पैसेही मिळत. सुतार बैलगाडी तयार करी. याबद्दल पोळयाच्या दिवशी सुताराला पोळी मिळे.[७]

## चांभार

चांभाराचा व्यवसाय चामडयाच्या वस्तू तयार करुन देणे हा असे. मोट तयार करणे, ती दुरुस्त करणे, यासाठी शेतकऱ्याला चांभाराची आवश्यकता असे.[८] बैलगाडीच्या जोखडाला चामडयाच्या वादयांनी बैल बांधीत असत. जरुर त्या चामडयाच्या वस्तू तयार करण्यासाठी चांभाराची सेवा त्यामुळे महत्त्वाची होती. म्हणून ऊस गाळण्याच्या हंगामात चांभाराला ५ ऊस आणि गुळाच्या ५ ढेपी देण्यात येत. अप्रसिध्द यादीवरुन असे दिसते की, सर्व बलुतेदारात चांभाराला सर्वात जास्त प्राप्ती असे. ती सव्वानऊ टक्के होई.[९]

**मांग व महार**

महार व मांग हे अस्पृश्य जातीचे असत. परंतु ग्रामीण समाजाला असलेल्या त्याच्या सेवेच महत्त्व लक्षात घेऊन त्यांची गणना पहिल्या प्रतीच्या बलुतेदारांमध्ये सुतार आणि चांभाराबरोबर केलेली दिसते.

एल्फिन्स्टनने आपल्या अहवालात महारांच्या कामाची नोंद करुन ठेवली आहे. महसुलविषयक महारांचे प्रमुख काम म्हणजे प्रत्येक शेत व गांव यांच्या हद्दींची देखरेख करणे, त्यावर अतिक्रमण होणार नाही हे पहाणे, हद्दीच्या संदर्भात वाद निर्माण होईल तेंव्हा साक्षी देणे होय. शेतातील पीके वाढत असताना व ती कापून शेतात ठेवली असताना त्याच्यावर पहारा करणे हेही महाराचे काम असे.

एल्फिन्स्टनने निर्देश केलेल्या कामाखेरीज शेतीपध्दतीच्या व्यवस्थेत महाराने करावयाच्या अन्य कामाविषयीची माहिती अन्य कागदपत्रात उपलब्ध होते. ऊसाच्या रसापासून गुळ बनविण्याच्या कामात महाराच्या सेवेचा उपयोग केला जाई. रस आटविण्यासाठी ज्या चुलवाणावर ठेवीत ते महाराच्या ताब्यात देखरेखीसाठी असे. ऊसाचा रस काढण्यासाठी लावलेल्या चरखावर नेमलेल्या महाराला दररोज १० ऊस देण्यात येत. कापणीच्या हंगामात महाराला धान्यासह तीन पेंडया पिकाच्या देण्यात येत. गावाच्या आरोग्य रक्षणाच्या दृष्टीने मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणे हे महाराचे एक महत्त्वाचे काम असे. मेलेल्या जनावराचे कातडे महार घेत असे.[१०] मात्र नांगराच्या बैलाचे कातडे तो घेत नसे. त्याला रात्रीचा गावाच्या रक्षणासाठी पहारा दयावा लागे. म्हणून त्याला 'जागल्या' महार म्हणत. तसेच व्यक्तीच्या निधनाचे वृत्त नातेवाईकांकडे पोहचविण्याचे काम त्याला करावे लागे. महाराने गांवची कामे केली नाहीत तर त्याला थोडाफार दंड भरावा लागे.

**अलुतेदार**

मराठेकालीन गावगाडयामध्ये गाव कामगार वतनदार, मिरासदार आणि उपरी यांच्याप्रमाणे बलुतेदार व अलुतेदारांचा समावेश होत असे. अलुतेदाराच्या धंदयावाचून कुणब्याचे नडत नसे. त्याला 'नारु' असेही म्हणत.[११]

अलुतेदारात प्रामुख्याने कोळी, तेली, शिंपी, कासार, तांबोळी इ. अनेक अलुतेदांरांचा समावेश होत असे.

कोकणात मासेमारीचा व्यवसाय कोळी करीत. मासेमारीसाठी ते समुद्रावर जात असत. त्यांना या मासेमारीबाबत सरकारात कांही प्रमाणात कर दयावा लागे. कोळयांच्या उपजीविकेची साधने नष्ट झाल्यास त्यांना करात सूट मिळे. चौल, रेवदंडा, येरवडा या तिन्ही गावातील कोळी समुद्रावर मासेमारीचा व्यवसाय करीत.

पेशव्यांच्या राज्यात किल्ल्याभोवती संरक्षणासाठी चौक्या असत. त्या चौक्यावर रखवाली करण्यासाठी रामोशी आणि भिल्लाबरोबर कोळीही असत.

कोळी जातीत कांही पोट भाग होते. समुद्रावर मासे धरणारे हे सोनकोळी होते. पुरुष रात्री मासे पकडीत असत आणि त्यांच्या स्त्रिया दिवसा मासे विकत.[१२]

महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीमुळे समुद्रकिनाऱ्यांची मासेमारी व गोडया पाण्यातील मासेमारी असे क्षेत्र मस्त्यव्यवसायाला लाभले होते. सागरी पाण्याच्या मासेमारीत कोळंबी, चिंबोरी, माकुळ, कालवे, शिवळया, बोंबील, सरंगा, हलवा, इ. माशांचा समावेश होत असे. पेण, पनवेल, रोहा, नागोठणे, कल्याण इ. बंदरातून कोळी मासे आणून विकत.

मासे मारण्यासाठी विशिष्ट असा हंगाम असे. पावसाळा आल्यानंतर मासेमारी बंद होत असे. ऑगस्ट महिन्यापासून दसऱ्यापर्यंत मासेमारीचा मोठा हंगाम असे. यावेळी मासे पकडणे सोपे असे.

**विणकर**

विणकाम व्यवसायात साळी, कोष्टी,धनगर, पटवेकरी, जंगम या जातींचा समावेश होत असे. या सर्व जाती आपला व्यवसाय हातमागावर करीत असत. आणि प्रत्येक भागास त्यांना कर द्यावा लागे. गावातील वतनदार मंडळीना घोंगडी, धोतरजोडी द्यावी लागे.

चौल येथे पूर्वी रेशीम उद्योग मोठया प्रमाणात होता नंतर तो व्यवसाय संपुष्टात आल्याने त्याला उर्जितावस्थेत आणण्यासाठी आंग्रेनी त्यास उत्तेजन दिले.[१३]

लखमाजी, सातपुत्या, यताजी भावेकर, हरबाजी, भंडारी, धोंडोजी काजवा यांनी चौल येथे माग घालून त्यांनी दरवर्षाला ३ रुपये महसूल द्यावा असे ठरले.

वरील गोष्टींचा विचार करता हस्तव्यवसाय हे पेशवेकालीन कोकणातील पुष्कळ लोकांच्या चरितार्थाचे साधन होते. कापडाचा व्यवसाय हातमागावर होत असल्याने वस्त्रोत्पादन कला ही पित्याकडून पुत्राकडे वंशपरंपरेने संक्रमीत होत असे. कांही रेशमी वस्त्रे पेशवाईत भारतातून परदेशात निर्यात होऊ लागली होती. सर्व प्रकारचे कापड हातमागावर होत असल्यामुळे पेशवाईच्या काळात मागावर काम करणारांचा फार मोठा वर्ग कोकणात निर्माण झाला होता. परंतु मुंबई हे इंग्रजांनी घेतल्यानंतर मुंबईत कापड धंदयाला उत्तेजन दिले गेले आणि अनेक कोष्टी मुंबईस जाऊन स्थायिक झाले.[१४]

## कलाल

कलाल म्हणजे दारु विक्रीचा व्यवसाय करणारे लोक. कलाल यास संस्कृतमध्ये कल्यपाल, कलवार, कलार, कलान अशी नांवे आढळतात. ठाणे जिल्हयात कलालांस 'कलार' असे म्हणत.[१५] मद्य म्हणजे एक प्रकारचे मादक पेय होय. प्राचीन काळापासून भारतातील लोक मादक पेय पीत असत. मद्यनिर्मितीची कला ही भारतीयांना प्राचीन काळापासून माहित होती. त्यामुळे समाजातील सर्व थरात मद्यपानाची प्रथा रुढ होती. वेदकाळी सोम व सुरा अशा दोन मादक पेयांचा उपयोग केला जाई. सोम रस हे मद्य असून सोम नामक वनस्पतीपासून हा रस काढला जाई. सोमरस हा सोम नामक वल्ली कुटुन काढलेला व गाळलेला रस होय. तो इंद्रादी देवांच्या ठिकाणी मद म्हणजे कैफ व उत्कट आनंद निर्माण करतो असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात.[१६]

दारुच्या दुकानावर कोतवालाची व सरकारी अधिकाऱ्यांची नजर असे. गावात अगर चार गांवाकरिता एक असे कलालाचे दुकान असे व ते गावाबाहेर असे. परंतु एखादी व्यक्ती दारुच्या नशेत रस्त्याने धुंद झालेली दिसल्यास त्या व्यक्तीस सरकारातून शासन होत असे.

सवाई माधवरावाचे दारुवर निर्बंध राखण्याचे धोरण होते.[१७]

## गुलामगिरी

प्राचीन ग्रीस समाजाचे गुलामगिरी हे एक वैशिष्टयपूर्ण लक्षण होते. वैदिक काळामध्येही दासांच्या आणि गुलामांच्या वर्गाचा उल्लेख आढळतो. पाली वाङ्मयावरुन असे स्पष्ट होते की, बुध्दाच्या काळात गुलामगिरी चांगलीच प्रचारात होती.[१८]

या काळी प्रचलित असलेल्या गुलामगिरीची कांही विशेष वैशिष्टये होती. त्यातील एक वैशिष्टय म्हणजे युध्दात कैदी म्हणून पकडलेल्या माणसांनासुध्दा क्वचितच गुलाम करीत. त्यावेळी प्रचारात असलेल्या पध्दतीप्रमाणे सुमारे १० वर्षे वयाचे मुलगे विकत नसत.[१९] त्या काळी युध्दे व त्यानंतरची लुटालुट, जास्त मुले असणे आणि गुलांमाचा व्यापार यामुळे मुख्यत्वेकरुन गुलामी उद्‌भवत असे. पराभूत झालेल्यांच्या स्त्रिया आणि मुली यांना विजयी सेना मुक्तपणे पकडून आपल्या प्रदेशात गुलाम म्हणून विकण्यासाठी नेत. गुलामांचा व्यापार हे गुलामगिरीचे महत्त्वाचे व थेट साधन होते. आर्थिक दुरावस्थेत आई-वडिल, आपली मुले व बहिण-भाऊ यांना विकत असत. असा व्यापार विशेषतः दुष्काळात व राजकीय अस्वस्थतेच्या काळात जोर धरी.[२०] तसेच रस्त्यात एखादे मुल सापडल्यास, ज्याला ते सापडेल तो त्याला गुलामगिरीसाठी विकू शकत असे. स्त्रियांनी व्यभिचाराचा गुन्हा केल्यास त्यांना गुलाम म्हणून विकण्यात येई. मात्र हिंदू कायदयात अशा प्रकारीच तरतूद नाही.

गुलामगिरी कोकणात मध्ययुगीन ब्रिटीश काळापर्यंत प्रचारात होती. पुरुष गुलामांना ‘पोरगा’ म्हणत आणि स्त्री घरगुती गुलामांना कुणबीण (बटकी) म्हणत. इतर प्रदेशातल्या प्रमाणेच त्यांची खरेदी विक्री होत असे. विशेषतः स्त्री गुलामांचा व्यापार तेजीत असे. त्यांची खरेदी विक्री मोठया प्रमाणात होई. या स्त्रिया निरनिराळया वयोगटातील असत. बहुतेक अविवाहित व शुद्र जातीच्या असत. कांही स्त्री गुलाम हिंदू व क्वचित मुस्लिम असत. प्रत्येक स्त्री गुलामाची किंमत, तिच्या गुलाम म्हणून असणाऱ्या गुणानुसार ५० रु. ते १०० रु. असे. स्त्री गुलामांची योजना घर कामगार म्हणून आणि अन्य विधीत दासी म्हणून देणगी देण्यासाठी करीत.[२१] मुस्लिम व सिद्दी गुलाम आढळतात पण महार, मांग इ. पैकी कोणीही गुलाम कोठेच

आढळत नाहीत. धनगर, सोनार, सुतार, माळी, कोळी, लोहार या जातीपैकीच लोक गुलामगिरीत आढळतात. पेशवे, सरदार, सावकार, व्यापारी यांच्याकडे असलेल्या स्त्री गुलामांना चांगल्या तऱ्हेची वागणूक व जेवणखाण मिळे. कोठे कोठे गुलामांची उपासमार होई. इ. स. १७६२-६३ मध्ये १३०३/- रु. १९५ कुणबींना दसरा महोत्सवाच्याप्रसंगी साडी चोळीसाठी देण्यात आले होते.[२२] एका ठिकाणी असा उल्लेख आहे की, त्यांच्या मालकीणीच्या मृत्यूच्यावेळी त्यांना डोक्याला तेल लावावयास देत असत. यावरुन असे दिसते की, त्यांना वाईट दर्जाचे खाणे व वस्त्रे देत असत. त्या काळात गुलामांचे मालक असणे सामान्य गोष्ट होती आणि शासनकर्त्यांकडे जास्त गुलाम असत. कधी कधी शासनही गुलामांचा व्यापार करत असे. १८००-१८०१ साली रत्नागिरी तालुक्याच्या मामलेदारांना खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले.

''रत्नागिरी तालुक्यात स्त्री गुलामांची संख्या जास्त असल्याने, संबंधित अधिकाऱ्याने अगदी आवश्यक तेवढेच शासकीय कामासाठी ठेवावेत आणि बाकीचे विकून टाकावेत. सरदार, सरकारी अधिकारी, व्यापारी, सावकार असे लोक मोठया संख्येने गुलाम ठेवीत यात शंका नाही. कल्याणच्या सुभेदाराकडे त्याच्या मृत्यूच्यावेळी २९ स्त्री गुलाम होत्या.[२३] शासकीय अधिकाऱ्यांना कधीकधी वस्तूच्या स्वरुपात पगार देत आणि कधीकधी गुलामांचा समावेश असे. दासांना कांही अधिकार असत व पगाराशिवाय इतर वर प्राप्ती होई.

## वेठबिगारी

त्या काळात जबरदस्तीने कामे करुन घेतली जात. त्याला वेठबिगारी म्हणत. उच्चवर्णियांची गरज भागविण्याकरिता खालच्या वर्गाच्या लोकांना वेठबिगारी करावी लागे. त्या काळी ७ प्रकारची वेठबिगारी होती असे दिसते.[२४]

१) किल्ले, पोलीस ठाणी, स्थानिक अधिकाऱ्यांची घरदुरुस्ती, पाटबंधारे दुरुस्ती.

२) शासनाच्या धान्याची, लाकडांची व अन्य मालाची वाहतूक.

३) निरनिराळया ठिकाणी विखुरलेल्या शासकीय कुरणातील गवत कापणे.

४) विविध प्रकारची अन्य प्रकारची अन्य कामे व शासकीय तबेल्यातील घोडयांची कामे.

५) चौकी आणि बाजाराची ठिकाणे येथे पहारेकरी म्हणून करावयाची कामे.

६) गावातील इनामदार व खोत यांची घरे बांधणे.

७) हमाली करणे.

लग्नकार्य, होमहवन यावेळी शूद्र जातीतील कुंभार, सुतार, लोहार आणि बांबू काम करणारे यांच्याकडून वेठबिगारी कामे विनामूल्य करुन घेतली जात.

हमाली करणारे मजूर यांच्याकडून जळाऊ लाकडे जमा करणे, गुरांचे, बैलांचे गोठे बांधून घेणे, शस्त्रसामुग्रीसाठी घरे बांधणे इ. कामे करुन घेत.

अशा प्रकारे निरनिराळया शूद्र जातीवर सतत बिगारी कामासाठी दबाव आणून त्यांच्या परंपरागत धंदयाची कामे शासकीय किंवा स्थानिक अधिकारी वेठबिगारी पध्दतीने करुन घेत.[२५]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**समाजातील स्त्रीचे स्थान**

हिंदु कुटुंबात स्त्रीयांना आपल्या वडिलार्जित संपत्तीत वाटा नसे. कारण धर्माने त्यांना तो वारसा हक्क दिलेला नाही.

प्रचलित दृष्टिकोनातून स्त्रीला तिचे सुशील पत्नीत्त्व आणि विनम्रता यांचे पालन करणे हेच महत्त्वाचे ध्येय ठरलेले होते. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धातील स्त्रियांना सर्व प्रकारच्या सामाजिक त्रुटींचा सामना करावा लागे. कांही अपवाद सोडले तर त्यांना चांगले शिक्षणही मिळत नसे. तिचे लहान वयात लग्न होत असे. आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य तिला नव्हते. लग्नाच्यावेळी वधुपित्याला वराला मोठा हुंडा द्यावा लागे. देवगड, रत्नागिरी, कल्याण, भिंवडी येथील मामलेदारांस दुसऱ्या बाजीरावाने असे हुकूम सोडले होते की, वरील प्रांतात कोणी हुंडा घेऊन लग्न ठरविल्यास ते पेशव्यांना कळविण्यात यावे.[२६]

पती व पत्नी यांचे कुटुंबात जवळचे संबंध नव्हते. पती हा आपल्या पत्नीपेक्षा आई व बहिणीच्या प्रभावाखाली असे अशा प्रकारे तरुण सून ही आपल्या विशेष करुन सासूच्या हुकूमात असे व ती करीत असलेल्या सुनेच्या छळात तिचा पतीदेखील सामील झालेला दिसे. अशा छळवादाचा परिणाम म्हणून सुनांनी आत्महत्या केल्याची उदाहरणे आढळत.[२७]

बालविवाहाची पध्दती प्रचलित होती. उदा. थोरल्या माधवरावाचा वयाच्या ९ व्या वर्षी ५ वर्षे वयाच्या गोपिकाबाईशी विवाह झाला. ही पध्दती खालच्या जातीच्या लोकांच्यातही होती. बालविवाहात वराचे वय १३ ते १४ वर्षे तर वधुचे १० ते ११ वर्षे असे.

जर काही वर्षानंतर पत्नीचा मृत्यू झाला तर पतीला पुनर्विवाह करण्याची सवलत असे. आणि ८ ते ९ वर्षावरील मुली मिळत नसत. त्यामुळे लहान वयाच्या मुलीशी त्याचा दुसरा विवाह होत असे. या पध्दतीमुळे वयात खूप अंतर असलेले विवाह घडून येत. त्याचमुळे कुटुंबात स्त्रीचे जीवन अतिशय कष्टमय असे. बहुभार्या व उतारवयातील विवाह यामुळे मुलींना लहान वयातच वैधव्य प्राप्त होण्याची भिती असे.[२८]

पत्नीचे जीवन जगता यावे म्हणून गवळी जातीतील एक स्त्री कल्याण प्रांतातील आबटे गावी एका हरजी गवळी नावाच्या व्यक्तीकडे सेवक म्हणून राहिली. तिला त्याच्यापासून संभाजी नावाचा मुलगा झाला आणि संभाजीला जातीत घेण्याची व्यवस्था त्यांनी केली. परंतु त्याच्या मृत्यूनंतर लगेचच जातवाल्यांनी त्याचा वारसा तोडून टाकला आणि आपले उर्वरीत आयुष्य त्याला अनाथ म्हणून जगावे लागले.[२९]

विधवेला सती जाण्यापासून परावृत्त करण्यासाठी दत्तक घेणे किंवा तिला कांही आर्थिक आश्वासन देणे या गोष्टीही केल्या जात. पेशव्यांच्या काळात सतीची चाल फार मोठया प्रमाणात होती. ब्राम्हण, मराठा आणि तत्सम लढवय्या जमातील ही प्रथा प्रामुख्याने होती.

सती जाण्याला धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. सती जाणाऱ्या स्त्रीला सरळ स्वर्गात जागा मिळते अशी लोकांची अंधश्रध्दा होती. थोरल्या माधवराव पेशव्याची पत्नी रमाबाई सती गेली.

उच्चवर्गात हुंडा पध्दती प्रचलित होती. कांही जातीत मुलीच्या बापाला मुलांच्याकडून चांगल्या प्रकारची रक्कम मिळत असे. लग्नासाठी मुलींची खरेदी केली

जाई. रायगड व रत्नागिरी तालुक्यातील ब्राम्हणांच्या मुली विकण्यावर दुसरे बाजीराव पेशवे यांनी बंदी घातली होती.[३०] ब्राम्हणांच्या मुलींचे लग्न ९ वर्षे वयापूर्वी करण्याचा कायदा होता.

मराठा राजवटीत ब्राम्हणेतर कुटुंबातील विधवांना पुनर्विवाहाची परवानगी होती. आपले धार्मिक वर्चस्व वाढविण्यासाठी प्रभु आणि सोनार हयांनीदेखील विधवा विवाहाला बंदी घालण्याचा प्रयत्न केला. मराठयांत विधवा विवाहाला 'पाट' असे म्हणतात. पाट लावलेल्या दुसऱ्या लग्नाच्या पत्नीला पहिल्या लग्नाच्या पत्नीप्रमाणे हक्क नसत. वतन देताना तिच्या मुलांना दुय्यम स्थान असे.

स्त्रीचे समाजातील स्थान तिच्या नवऱ्याच्या स्थानावर अवलंबून असे. जोपर्यंत तिचा पती जिवंत असे तोपर्यंतच तिला कुटुंबात स्थान असे. पतीवरील आपल्या प्रभावामुळेच तिला घरातील व्यवहारात वादातित हक्क असे आणि घरच्या धार्मिक समारंभात, उत्सवात ती मार्गदर्शक होत असे. हिंदु स्त्रिया आपल्या पतीचा विश्वास कमावित आणि कुटुंबाची मिळकत, पैसा, दागदागिने आणि सर्वांच्या त्या रक्षक असत. कुटुंबाची व्यवस्था, मुलांचे विवाह यात त्यांचे म्हणणे प्रभावी असे.

कोकणात स्त्रियांचे १) घरंदाज स्त्रिया, २) सामान्य स्त्रिया (देवदासी) ३) वेश्या हे तीन वर्ग होते.[३१]

**ग्रामदेवता व उपासना**

कोकणातील प्रत्येक गावात नियमितपणे ग्रामदेवतांची उपासना व आराधना केली जाई. यमाई, सटवाई, वेताळ, वाघोबा, कल्याणी, विनयी, काळी, कनकेली इ.

प्रमुख ग्रामदेवता होत्या.[३२] त्याशिवाय खंडोबा, मारुती, मुंजा, पीर, तुकाई, गीरमाई आणि सुरी याही देवता होत्या.[३३]

मॅनियर विल्यम्सच्या मते हया ग्रामदेवता प्राचीन जमातीच्या लोकांनी निर्माण केलेल्या काल्पनिक मूर्ती असून त्यांना हिंदूतील चतुर ब्राम्हणांनी आपल्या धर्माकडे सामान्यांना वळवून घेण्यासाठी सामावून घेतले. ग्रामदेवता ही संकटकाळात शक्ती देणारी देवता समजली जाई व ती शक्ती गावकऱ्यांना आनंद व भरभराटीविषयी असे. दसरा, होळी, इ. सारख्या उत्सवाचे दिवशी या देवांना रेडा, बकरा यांचे बळी गावच्या वेशीवर त्यांना खुश करण्यासाठी आणि त्यामुळे गावाला भरभराट येण्यासाठी देण्याची पध्दत होती.[३४]

ग्रामदेवतेचे काम गावाचे रक्षण करणे हे होते. परंतु खास करुन रोग आणि आपत्ती यापासून रक्षण करण्याची शक्ती त्यांच्यात होती असे मानले जाई. विशिष्ट प्रकारचे धार्मिक समज व समारंभाला उपयुक्त म्हणून ग्रामदेवतांची वैशिष्टये निश्चित झाली होती. त्यांची पूजा करणारे केवळ ब्राम्हणच नसत तर इतर जातीतीलही असत. उच्च किंवा निच यापैकी कोणीही आपण पूर्वजांचे वारस आहोत असे म्हणविताना अभिमान किंवा मत्सर बाळगीत नसत.[३५] जर ग्रामदेवतांना परंपरागत देणी दिली नाहीत किंवा त्यांना डिवचले तर त्या सूड घेतात असे मानले जाई.

कोकणात कित्येक गावात 'पांढर' ही ग्रामदेवता मानली जाई. तिचा पुजारी बहुधा गुरव किंवा मराठा कुणबी असे. प्रत्येक पौर्णिमेला नारळ तसेच पेरणी कापणीच्यावेळी बकरा, कोंबडा अशी देणी दिली जात. रवळनाथ, मौली, वेताळ, रामेश्वर, जैन आणि हनुमान या देवता सामान्यपणे सर्वत्र पुजल्या जात. आंजगांव्या देवळातील वेताळाला दरमहा चपलेचा जोड वाहिला जाई.[३६]

ग्रामदेवता कॉलरा, देवी, प्लेग यासारखे रोग सूड घेण्यासाठी आणतात असे मानले जाई. हे रोग टाळण्यासाठी गावकरी योग्यवेळी प्राणी आणि इतर देणी देऊन त्यांची वैशिष्टयपूर्ण पूजा वेळोवेळी करत. देवीच्या रोगाची देवता लक्ष्मी हिची आराधना करण्यासाठी तिच्याकरिता यात्रा भरवून तिची पूजा केल्याची उदाहरणे आढळतात. एखादे रोगी मूल ज्याला देवीच्या रोगाने ग्रासले आहे त्यात बायांनी प्रवेश केला आहे असे मानून त्यांची पूजा अबीर फुलांचे हार यांनी करीत. त्या देवीची सतत कांही दिवस पूजा केली जाई.

साथीचे रोग हे खालच्या जातीच्या लोकांनी केलेले चेटूक समजण्यात येई आणि ते टाळण्याची क्षमता ग्रामदेवतेत असल्याचे मानीत. गांवकरी त्यांना कोंबडे, बकरे आणि नारळ देऊन प्रसन्न करीत.

हिंदू अपत्य प्राप्तीसाठी किंवा तसेच कांही मिळविण्यासाठी नवस करीत आणि इच्छा पूर्ती झाल्यावर तो नवस फेडीत. शंकराकरिता लघुरुद्रासारखे खास समारंभ करीत. पेढयासारख्या गोडाच्या वस्तू नवस पूर्तीसाठी देवाला अर्पण करीत. धर्मशाळा बांधणे, नवीन विहिरी खणणे, गरीबांना अन्न आणि कपडे अर्पण करणे यासारख्या गोष्टी नवस फेडण्याकरिता करीत. स्त्रीया औदुंबर किंवा पिंपळाला प्रदक्षिणा घालणे, नारळ, साखर, गुळ, तांबे, चांदी इ. आपल्या मुलाच्या वजनाइतके दान करणे असे नवस सामान्य रोग किंवा कौटुंबिक आपत्ती टाळण्याकरिता करीत. राजा किंवा शासन यांचे प्रजेचे कल्याण हे कर्तव्य समजले जाई. अवर्षण किंवा धरणीकंप, रोगाची साथ यासारख्या आपत्तीच्या काळी अनुष्ठान करणे किंवा त्यासारखे विधी करण्याची आज्ञा शासन आपल्या अधिकारीवर्गाला देत असे.[३९]

दुष्टग्रह यांचे भय भुतांप्रमाणे होते आणि ब्राम्हणांना दान दिल्याने त्यांना संतुष्ट करता येते असे मानले जाई. व्यक्तीच्या जीवनातील भविष्यकाळातील प्रसंग किंवा महत्त्वाचे कालखंड यांचे भविष्य वर्तविण्यासाठी कुंडल्या करीत. आंग्रे आपल्या कुटुंबातील माणसांच्या जीवनातील भविष्याचे कथन करण्यासाठी ज्योतिषांशी सल्लासमलत करीत. स्त्रीया या चेटूक करणे व भूते उठविणे यात तरबेज असत. अशिक्षित समाजात श्रेष्ठ व्यक्ती या मृत्यूनंतर सामान्यपणे भूत होऊन अदृश्य फिरत असतात या समजुतीने गोंधळ उडून जाई. आणि त्यामुळे त्या अदृश्य जगातील भूतांची पूजा केली जाई. त्यांना संतुष्ट करणे भाग असे. कारण ते वेळोवेळी भिववित असत.[३८] कुठे अनाकलनीय रोग, आजार, दुर्दैव, आघात आणि कधीकधी मृत्यूदेखील घडवून आणण्याचे चाळे करत असे मानले जाई. पेशवाईत जे लोक एखाद्या व्यक्तीच्या अगर कुटुंबाच्या विरुध्द भूतांना उठवित त्यांनी जर त्या व्यक्तीला त्यातून मुक्त केले नाही तर फार मोठी शिक्षा त्यांना केली जाई. प्रार्थना करणे, विविध प्रकारचे उपचार करणे यामुळे दुष्ट शक्तीच्या परिणामातून आपण मुक्त होऊ असे लोक मानीत. ज्या रोगांचे निदान होत नसे ते भूतांनी केले असे समजून मांत्रिकाला बोलाविले जाई. हे मांत्रिक हा एक धंदेवाईक वर्ग होता. त्यांना भगत, दरवेशी, तांत्रिक, मांत्रिक आणि पंचाक्षरी म्हणून ओळखले जाई. ते दुष्टाला ओळखून बंधन करण्यात तरबेज समजले जात. चेटूक किंवा जादूटोणा करणाऱ्या माणसाचा गुन्हा सिध्द झाल्यास त्याला मृत्यूदंडाची शिक्षा मिळे. त्याला कामावरुन कमी करुन वतन असल्यास रद्द केले जाई. कांही वेळा त्याला हद्दपार केले जाई. उच्चकुलीन लोकदेखील तंत्रविद्येवर विश्वास ठेवीत.[३९]

एक महादेवशास्त्री नावाचा सुप्रसिध्द मांत्रिक म्हणजे जादूटोण्याच्या विद्येत प्रविण असल्याचे नाना फडणीसाने ऐकले म्हणून त्यांच्या तंत्रविद्येने तो शत्रूचा नाश करु

शकेल का हयाची विचारणा करुन ब्रिटिशांचा नाश करण्यास किती काळ लागेल याची विचारणा करण्यासाठी त्यांनी आपला दूत त्याच्याकडे पाठविला होता.[४०]

कोकणात भूतांचे प्रस्थ फार होते. विशेषतः रत्नागिरी जिल्हयातील लोक दरिद्री, जमीनीच्या लहानशा तुकडयावरुन व घर ठाण्यावरुनही त्यांच्यात भाऊबंदकीची व इतर भांडणे होत. ज्याच्याशी वाकडे असेल त्याच्यावर भूते घालून त्याचे पारिपत्य करणे हा कोकणातील लोकांचा सर्वसाधारण इलाज होता. भूते अन्यायाने कोणावर घातली असल्यास त्यापासून रयतेचे रक्षण करणे हा सरकारास एक उद्योगच होऊन बसला होता.

"सदाशिव भट देवधर कसबे मीठगावणे हे आपले घर सोडून पोट भरण्याकरिता परागंदा झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या ठिकाणात बाबदेव भट परांजपे हे येऊन राहिले. त्याजपाशी सदाशिव भटांनी ठिकाण मोकळे करुन मागितले. पण बाबदेव भट कांही केल्या ऐकेनात तेंव्हा दाद मागण्यासाठी सदाशिव भट हे श्रावणमासी सुभ्याकडे गेले हे पाहून परांजपे यांनी सदाशिव भटाची खोड मोडण्यासाठी त्यावर भूते घातली. त्यामुळे सदाशिव भट अधिकच संकटात आल्याने सरकारास त्याचा दोन्ही अडचणीतून बचाव करणे भाग पडून पेशवे सरकारनी पुण्याहून विजयदुर्गाचे सुभेदार नारो त्रिंबक यास हुकूम केला की, भूतांची चौकशी करावी, भूते खरी ठरल्यास भुतावळयाकडून म्हणजे भूत घालणाऱ्याकडून दंडादाखल खंड घ्यावा आणि भूतांची वारावार करुन देवधरास उपसर्ग न होय ते करावे.[४१]

कोकणातील 'लांजे' यागावी ५ ते ७ ठिकाणी भूते घालण्याचे आढळून आले. ही भूते ज्यांनी घातली तो बाळ महाजन खोत यानेही आपला अपराध कबूल केला.

तेंव्हा सरकारकडून त्याचे खोती उत्पन्न जप्त करण्यात आलेच. पण शिवाय त्याला देशावर जाण्याचा हुकूम झाला.

भूतांची भिती भटा-भिक्षुकांनाच वाटत होती असे नाहीतर लढायातून तलवार मारणाऱ्या शूर पुरुषांनाही भूते भिववित''. शंकराजी केशव फडके व त्याचे दोन बंधू हे परगणा माहिम येथे देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी होते. त्यांनी वसईचा किल्ला पोर्तुगीजांपासून घेण्याच्या मसलतीत श्रमसाहस बहुत केले म्हणून या कामगिरीबद्दल त्यास दहिवले हा गांव इनाम करुन दिला होता. पण त्या गांवात भुताटकी असल्यामुळे त्याचा मोबदला त्यांनी 'नगावे' हा गांव मागितला. तो त्यास पेशव्यांनी इनाम दिला.[४२]

भूते घालण्याचे बंड कोकणात पुढे पुढे फारच गाजून त्यांच्या बंदोबस्ताचा पेशवे सरकारास विशेष विचार करावा लागला. सन १७७४-७५ साली अंजनवेल, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, विजयदुर्ग, देवगड व सौंदल या तालुक्यात पेशवे सरकारने दोन अधिकारी नेमले व त्यांच्या मदतीला २ कारकून व ६ शिपाई दिले. या अधिकाऱ्यांस सालीना ३५० रु. पगार व २६१ रु. भत्ता ठरला होता. सदर अधिकाऱ्याने गुन्हेगाराची शक्ती पाहून त्यास २५ ते ५० रु. दंड करावयाचे असे.[४३]

## चेटूक

सन १७७५-७६ साली मार्तंड जोशी रायरीकर यास चेटूक केल्याच्या अपराधासाठी पेशवे सरकारने किल्ल्यावर अटकेत ठेवले होते. त्याने अटकेत असताना भस्म अगर गंध लावू नये, संध्या करु नये, स्त्रोत्रे म्हणू नयेत, दिवसातून एकदा जेवावे तेही आपल्या हाताने अन्न शिजवून जेवावे अशी त्याला करडी शिक्षा होती.[४४]

दुष्ट नजर, दृष्ट लागण्याची भिती ही अंधश्रध्दा सर्वत्र होती. मुलाच्या जन्माच्यावेळी दुष्ट आणि मत्सरी माणसाची नजर टाळण्याचा प्रयत्न केला जाई. लोक नजर लागू नये म्हणून आपल्या मुलाला हलक्या प्रतीची कपडे घालीत.[४५]

पेशव्याच्या काळात जादुटोण्याच्या खोटया आरोपाला देखील दंड केला जात असे आणि जे लोक हे करीत ते विशेषतः खालच्या जातीचे असत व त्यांना कडक शासन केले जाई. कांही शकून शुभ आणि अशुभ मानले जात. जर धुबड किंवा मांजर आडवे गेले तर अशुभ मानीत. स्वप्नांचादेखील अर्थ लावताना भविष्यांचे दर्शक समजत आणि पहाटेची स्वप्ने खरी मानीत. दागिन्यांनी मढलेली सुंदर मुलगी स्वप्नात येणे ही चांगली बातमी ऐकू येण्याची पूर्वसूचना आहे असे म्हणत.[४६]

**कोकणातील खोती पध्दती**

कोकणात खोती पध्दतीचा उदय १६ व्या शतकात झाला. उजाड झालेली गावे व जमीनी पूर्ववत समृध्द करण्यासाठी विजापूरचा युसुफ आदिलशहाने ही पध्दत सुरु केली. खोत म्हणून विजयनगरच्या राज्यातील महसूल अधिकाऱ्यांची व स्थानिक श्रीमंत माणसांची नेमणूक करण्यात आली.[४७] सन १५०२ मध्ये सावित्री नदी ते देवगडपर्यंतचा मालवण सोडून संपूर्ण रत्नागिरी प्रांतात ही पध्दत सुरु झाली. खोत हा शब्द जो कोकणात आढळतो त्याचा अर्थ शेतकरी की ज्याच्यामुळे जमीनीच्या महसुलात सुलभता निर्माण होईल. यांची नियुक्ती सरकारकडून होई. खोतीचा लिलाव बाहेरुन होत होता. जोपर्यंत खोताचे वरिष्ठ अधिकाऱ्याशी जुळत नव्हते तोपर्यंत खोती वंशपरंपरागत होऊ शकत नव्हती. सुरुवातीच्या काळातील खोतांच्या अधिकार व कार्याबद्दल माहिती मिळत नाही. पण खोती जमीन विकण्याचा अगर गहाण ठेवण्याचा अधिकार प्राप्त होण्यासाठी किमान दोन, तीन पिढयांचा काळ जावा लागे.[४८] पेशवे काळात वतन खोती विकली

जाऊ शकत होती. मराठा व मुस्लिम समाजाचे खोतीमुळे प्राप्त सामर्थ्य कमी झाले व बरीच ब्राम्हण कुटुंबे ती खरेदी करीत होते. परिणामी मराठा व मुस्लिम लोकांचे खोतीमुळे प्राप्त झालेले सामर्थ्य कमी झाले.

१८ व्या शतकात मुघलांच्या अधिपत्याखाली आंग्रे व नंतर पेशवा आणि शेवटी स्थानिक सुभा किंवा महाल अधिकारी तेंव्हा खोत हे जमीनीच्या विस्ताराशी संबंधित होते. बाळाजी बाजीरावच्या सनदेमध्ये प्रजेच्या विनंतीवरुन दुसऱ्याकडे खोती दिल्याचे आढळते. या नवीन तीन वर्षाच्या मक्त्यामध्ये खारवट, पडीक जमीन, देशमुखी गांवे खोतांच्या पूर्ण अधिकारात वाढत्या दराने दिली जात. खोतांना जमीनीची मशागत करण्याचे, उत्पादन वाढविण्याचे व परगण्याची लोकसंख्या वाढविण्यासाठी परमुलकी नवीन कुळांना जमीनीच्या मशागतीसाठी आणून जुन्या व नवीन कुळांची यादी सरकारकडे जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते.[४९]

इतर अनेक सनदामध्ये नमूद करण्यात आले आहे की, खेडयातील जमीन बहुतांशी पडीक होती व उरलेल्या शेतकऱ्यांनी (मशागत करणाऱ्यांनी) विनंती केल्यावरुन त्यांना ते खेडे वतन म्हणून दिले जात होते.[५०] खोत यांना आठवडयातून एक दिवस वेठबिगार मिळविण्याचा अधिकार होता. त्यामुळे मिठागरात त्यांचा उपयोग होई. तसेच रत्नागिरीमध्ये दलदल हटवून या खोतांनी भात पिकास योग्य जमीन खूप तयार केली.

कुलाबा व ठाणे या ओसाड शहरांची मशागतीची कामे प्रथमच पांढरपेशा वर्गाकडे किंवा ग्रामअधिकारी यांच्याकडे आली. तेंव्हा त्यांची मदत अपुरी पडली. हा प्रकार मराठयांनी जेंव्हा सुरुवातीला जमीन महसूल प्रारंभ केला तेंव्हा होता. सुरुवातीला हा प्रदेश ६ वर्षासाठी पगारी मामलतदारांच्या नियंत्रणात देण्यात आला

होता. नंतर सन १७६१ च्या काळात पहिल्या माधवरावाच्या बालपणात पूर्ण परगणा एक वर्षासाठी मशागतीसाठी दिला जात होता. मोघम कर त्यांच्यावर लादलेला होता. या काळात वेठबिगारीची मागणी वाढली होती. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत शेतकऱ्यांवरील कराचा बोजा वाढला होता. या काळात शेती पध्दतीमध्ये खोताला महत्त्व प्राप्त झाले होते. खोत हा शेतकरी व सरकार यांच्यातील मध्यस्थ होता.[५१] दक्षिण कोकणात जहागिरदार खोत पूर्वीपासून वतनदार म्हणून ओळखले जात होते. म्हणजेच वंशपरंपरेने शेतकरी होते. या कालखंडातील कांही उदाहरणे अशी आढळतात की ज्या वतनदार खोतांनी अस्थिर व संघर्षाच्या काळात गावे सोडली आणि परत येऊन पैसे भरुन किंवा ओळखीने वतने परत मिळविली. इतर प्रकारच्या वतनामध्ये सरकारला कांही रक्कम 'नजर' म्हणून द्यावी लागे. अशीही कांही उदाहरणे आहेत की, खोती अनुदानामध्ये मिळत होती.[५२]

सावित्री नदीच्या उत्तरेला किंवा (बाणकोट नदीच्या) वतनदार खोत नव्हते. याचे कदाचित महत्त्वाचे कारण हे असावे की, ही नदीच या आदिलशाही व निजामशाही राज्यातील सीमा होती. तरीही बाणकोट नदीच्या उत्तरेतील जमीनदार स्वतःला अभिमानाने विविध पदव्यांनी सन्मानित करत जसे रायगड व रत्नागिरीचे स्वतःला सरखोत म्हणत. ब्रिटीशांच्या दृष्टिकोनातून १९ व्या शतकात वतनदारी खोत व सरकारी खोत यामध्ये कांहीही फरक केलेला नव्हता. सर्वजण वंशपरंपरागत मानले जात होते. उत्तर आणि दक्षिण कोकणातील निम्म्यापेक्षा थोडी कमी गांवे खोतीची होती. ब्रिटीशांनी खूपच कमी प्रमाणात नवीन खोती दिल्या व दिलेल्या बऱ्याच परत घेतल्या. पण त्यांची संख्या पेशवाई संपण्याच्यावेळी बरीच होती. इतर गांवाचे वर्गीकरण 'खालसा धारेकरी', 'शेतीमजूर ताबा', 'खिचडी' किंवा अंशतः शेतकरी ताबा, अंशतः

मजूर ताबा किंवा इनाम, बरीच खेडी इनामी होती. शेतकरी व इनामदार यांच्यात समान (सारखे) नाते होते.

ब्रिटीशपूर्व काळात वतनदार खोत व इतर खोत यांच्यात फरक होता. वतनदारी खोती काढून घेतली जाऊ शकत नसे. उत्तर कोकणामध्ये अनुवंशिक ठेकेदार या पदाची टर उडविली जात होती. कारण खोती म्हणजे फक्त मक्ता शेत, वतनदार व खोत यांच्यामध्ये समेट साधणे कठीण होते. आदिलशाही राजवटीमध्ये फक्त दक्षिणेमध्ये खोती अनुवंशिक खोत यांचा विकास झाला याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते. खोत जेंव्हा त्यांच्या जमीनीच्या विस्तारामध्ये व पुनर्स्थापनेमध्ये व्यस्त होते त्याचवेळी त्यांनी स्वतःच्या जमीनीमध्ये खूप धनाची गुंतवणूक केली. तरीसुध्दा जोपर्यंत त्यांना अनुदान मिळत नव्हते तोपर्यंत ते स्वतःच्या संपत्तीबद्दल सुरक्षित नव्हते.[५३] उत्तरेतील जे अनुवंशिक खोत नव्हते त्यांची खोती सरकारच्या मर्जीवर अवलंबून होती. ते स्वतःच्या मालकीबद्दल व गुतवणुकीबद्दल चिंतीत रहात होते. कारण त्यांना त्यांची गुंतवणूक व फायदा हिरावून घेतला जाण्याची भिती असे. कागदपत्रात त्यांचा नेहमी बंधेकरी असा उल्लेख असे की जो वतनदार यांच्या विरुध्द अर्थाचा असे.[५४]

पेशवा दप्तरातील नोंदीमध्ये दक्षिणेतील आधीचे खोत नेहमी हटविले जात. पण त्यामध्ये आधीची वतन खोती परत घेतल्याचे उदाहरण नाही. त्यामुळे गावाचा कारभार हाती घेण्याआधी खोतीची अनुवंशिक सनद मिळविणे हे खोतांचे प्रमुख ध्येय होते. हंगामी खोतांच्या बाबतीत आपणाला असे दिसून येते की, हंगामी खोत मान्य करतात की, ते वतनदान खोत नाही. पण पेशव्यांना ते विनंती करीत की, त्यांची खोती काढून घेण्यात येऊ नये. कारण त्यांनी खेडयांच्या विकासाकरिता खूप पैसा खर्च केला आहे. सरकारला खेडयांचा विकास स्वतः करणे शक्य आहे असे वाटे तोपर्यंत सरकार

सनद देत नव्हते. सरकारचा नवीन सनद देण्याला विरोध असला तरी जुन्या सनदांचा सरकारला आदर करावा लागे. पेशवे कोकणच्या सरसुभेदाराला पत्रांत कळवितात की, पेशव्याच्या अधिकाराच्या अगोदर १५ ते १६ वर्षे, तुळाजी आंग्रेच्या काळात ज्या भटाकडे खोती होती त्याच्याकडेच ती ठेऊन २०० रु. नजर म्हणून घ्यावेत. तसेच पेशवे कळवितात की, खोती अनेक वर्षे एकाच्याच ताब्यात असू नये. तसेच ते मागणी करतात की, भटाच्या अनुवंशिक खोतीचे कागदपत्र तपासून पहावे व त्यात कांही शंकास्पद असेल तर ती खोती त्या भटाकडून काढून दुसऱ्याच्या ताब्यात द्यावी.[५५]

दक्षिण कोकणचे अनुवंशिक खोत व दक्षिणेतील दख्खनचे अनुवंशिक पाटील यांच्या विशेष हक्कामध्ये फरक होता. सनदी वतनदार खोतांना हंगामी खोताप्रमाणे मजुरांकडून जबरदस्तीने शेतावर काम करुन घेण्याचा अधिकार होता.

कोकणामध्ये कांही खेडयांचे प्रमुख किंवा 'गावकर' सरकारकडून इनाम मिळवित त्यांनाही कांही अधिकार होते.

दुसरे म्हणजे उत्तर आणि दक्षिण कोकणातील खोत त्या खेडयातील शेतकरी होते पण दख्खनमधील पाटील शेतकरी नव्हते. कोकणामध्ये अठराव्या शतकापर्यंत खेडयातील तालुकानिहाय जमाबंदीची पहाणी ७ ते १० वर्षातून एकदा होई. उलट दख्खनमध्ये प्रत्येक खेडयाची वर्षातून एकदा पाहणी होई.[५६] खोत जमाबंदीच्या रक्कमेला जबाबदार होते. पुढील तपासणीपर्यंतच्या काळात उत्पादीत जमीनीत वाढ झाली किंवा पडीक जमीनीत वाढ झाली तर खोतांना नफा किंवा तोटा सहन करावा लागे. परिस्थिती इस्तवा घेतल्यासारखी समान होती. इस्तवा म्हणजे सुरुवातीच्या काळात क्रमाने वाढणारा जमीन महसूल. इनाम जमीनीच्या बदल्यात त्यांना

शेतकऱ्यांपासून हक्क मिळत होते. त्याव्यतिरिक्त त्यांना शेतातील जो लाभ होत होता तोही मिळत होता. कधी कधी हा १० टक्क्यापेक्षा जास्त असे. जमीन भाडयाने देताना खोत सरकारी नियमाप्रमाणे वागत नव्हते. रयतेला जर कांही अटी मान्य नसतील तर ते नकार देत. कधी कधी हे दर सांमजस्याने ठरविले जात होते. पण जेंव्हा रयत व खोत यांच्यात सामंजस्य निर्माण होत नसे तेंव्हा बटाई करार केला जाई व समस्या सोडविली जाई. आणि त्यामध्ये अर्धे उत्पादन खोताला द्यावे लागे. ही व्यवस्था क्वचितच अंमलात आणली जाई. जेंव्हा दख्खनमध्ये पाटील व मामलतदार यांच्यात कुठलेही करार मान्य होत नव्हते तेंव्हा विशेष अधिकारी शेतीच्या तपासणीसाठी पाठविले जात. जर तरीही वाद मिटला नाही तर मामलतदाराला अर्धा भाग (हिस्सा) घेण्यास परवानगी दिली जात होती आणि अर्धा भाग जमीन करणाऱ्याला मिळत असे.[५७] अशाच पध्दतीचा वापर मध्य भारतात केला जात होता असे माल्मक म्हणतो. कोकणामध्ये दख्खनप्रमाणेच स्थानिक दर (कर) रयतेद्वारा भरावयाचे असत. कोकणामध्ये सरकारला कांहीच माहित नसे की, रयत खोताला किती भाग देतात किंवा खोतांना फायदा अगर तोटा किती होता? जर रयेतेची तक्रार हुजूरकडे आली तर सरकार रयतेच्यावतीने खोतांच्या व्यवहारात दखल देत होती. खोतांचा अत्याचार खूपच वाढला असेल तर सरकार खोतांची खोती काढून घेऊन ती दुसऱ्याला देत. जर खेडयाकडे खोताचे दुर्लक्ष झाले असेल तर असेच होई. सरकारी खोतीच्या खेडयांबाबत रयत समाधानी नसेल तर त्यांना अधिकारी बदलण्याची मुभा होती. त्यासाठी ठरविल्याप्रमाणे मक्ता सरकारला द्यावा लागेल. सरकारचे उत्पन्न जेंव्हा वाढले असेल तेंव्हा खोत त्यांना जास्त मागणी करण्यापासून वंचित करत होते. जेंव्हा नैसर्गिक आपत्तीमुळे शेती उत्पादनात घट होत होती तेंव्हा सरकारी करांचा दबाव कांहीवेळा कमी केला जात होता. खोत त्यांचे हिशोब स्वतः ठेवत असत. भाडयाचे पुस्तक

'बोतखत' हे त्यांचे वैयक्तिक कार्य होते. खोतांना सरकारला दरवर्षी 'झादती' (Jhadati) सूपूर्द करावी लागे. त्यात ज्याला महसूल अधिकाऱ्याने परवानगी दिलेली असे त्यांचाच फक्त उल्लेख करीत. सन १७६० च्या सुरुवातीला व नंतर ७ ते १० वर्षानंतरच तपासणी केली जात असे. खोतांनी शेतकऱ्यांवरील कर वाढविण्याचा प्रयत्न केला तर शेतकऱ्यांना तक्रार करण्याची पूर्ण मूभा होती. कितीतरी कर हिशोबामध्ये नव्हते. कांही तालुक्यापुरते मर्यादित होते. कांही फक्त महालापुरते आणि कांही फक्त खेडयांपुरते मर्यादित होते किंवा कांही व्यक्तीवर (फक्त कुणबी) कर लादले जात होते. पांढरपेशे क्वचितच करांमध्ये समाविष्ट असत.

## संदर्भ


१. इरावती कर्वे, महाराष्ट्र लँड अँड इटस् पिपल, पृ. ८३

२. घुर्ये, कास्ट, क्लास अँड ऑक्युपेशन, पृ. १५

३. कित्ता,

४. डॉ. वि. गो. खोबरेकर, मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन

५. कित्ता,

६. कित्ता, पृ. ३४

७. कित्ता,

८. कित्ता,

९. कित्ता,

१०. कित्ता, पृ. ३५

११. श्री.एस्. एस्. जावळे, पेशवेकालीन महाराष्ट्रातील धंदे व्यवसाय, एम्. फिल. प्रबंध, पृ. ७८

१२. कित्ता, पृ. ८०

१३. कित्ता, पृ. ९०

१४. कित्ता, पृ. ९१

१५. कित्ता, पृ. ९५

१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्राचीन भारतीय संस्कृतीतील मद्यविषयक आचारसंहिता, नवभारत, वर्ष ३१, अंक ८, पृ. १

१७. श्री एस्. वाय्. जावळे, पूर्वोक्त, पृ. ९५

१८. डॉ. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. ४०

१९. कित्ता,

२०. कित्ता,

२१. कित्ता, पृ. २१

२२. कित्ता,

२३. कित्ता,

२४. कित्ता, पृ. ४३

२५. कित्ता, पृ. ४४

२६. बाजीराव दुसरा, रोजनिशी, पृ. २६७-६८

२७. डॉ. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. ५४

२८. कित्ता,

२९. कित्ता,

३०. कित्ता, पृ. ५५

३१. कित्ता,

३२. जोशी, मराठेकालीन समजादर्शन, पृ. २१२

३३. पेशवे रोजनिशी, भाग ५, पृ. क्र. २५३

३४. पेशवे रोजनिशी, भाग ६, पृ. क्र. ८१६

३५. डॉ. वि. गो. खोबरेकर, पूवोक्त, पृ. ६८

३६. कित्ता,

३७. कित्ता, पृ. ६९

३८. कित्ता,

३९. कित्ता, पृ. ७०

४०. पेशवे दप्तर, ३२, लेख १९४

४१. वाड डा.२, पृ. ७०

४२. कित्ता,

४३. वा. कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. २१०, २१३, २१४, २१५

४४. कित्ता, पृ. २३०, २३१

४५. डॉ. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. ७०

४६. कित्ता

४७. अँड्रेविंक, लँड अँड सॉवरेंटी इन इंडिया, पृ. ३५९

४८. कित्ता,

४९. कित्ता, पृ. ३६०

५०. कित्ता,

५१. कित्ता, पृ. ३६१

५२. कित्ता,

५३. कित्ता, पृ. ३६२

५४. कित्ता,

५५. कित्ता, पृ. ३६३

५६. कित्ता,

५७. कित्ता, पृ. ३६४